क्रमांक : १००३३/क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : १ जुलै, २०२१.

: : **कार्यालयीन आदेश** : :

या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, सोमवार, दिनांक ५ जुलै, २०२१ रोजीपासून सुरु होणाऱ्या महाराष्ट्र विधीमंडळाच्यां द्वितीय (पावसाळी) अधिवेशनाच्या कामकाजाची तातडी लक्षात घेता तसेच राज्यातील कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता या सचिवालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांची कोरोना विषाणू संसर्ग नसल्याबाबतचा अधिवेशनाच्या अगदी लगतपूर्वीचा अधिकृत प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त होणे आवश्यक असल्याने RT-PCR कोरोना चाचणी करण्याची सुविधा शनिवार, दिनांक ३ जुलै, व रविवार, दिनांक ४ जुलै, २०२१ रोजी सकाळी ०९.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत उपलब्ध होणार आहे.

उक्त दोन दिवसांमध्ये या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी RT-PCR कोरोना चाचणी करुन घेण्यात यावी. मात्र जे अधिकारी व कर्मचारी उक्त दिवशी संपूर्ण कार्यालयीन वेळेत उपस्थित असतील त्यांनाच त्या दिवशीची बदली रजा अनुज्ञेय राहील.

त्यानुषंगाने शनिवार, दिनांक ३ जुलै, व रविवार, दिनांक ४ जुलै, २०२१ रोजी सार्वजनिक सुट्टी असली तरी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे कार्यालय सुरु राहणार असून उक्त दिवशी संवर्गनिहाय निश्चित केलेल्या वेळेनुसार हजेरीपट ठेवण्यात येईल तसेच उपरोक्त दिवशी सर्व अधिकारी/कर्मचारी यांची १००% उपस्थिती अनिवार्य राहील.

आदेशानुसार,
**( सुभाष नलावडे )**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति,**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद / महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

..२/-

४) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.

६) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

७) सर्व समिती प्रमुख यांचे कार्यालय.

८) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.

१०) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कर्मचारी.

११) सर्व विधीमंडळ पक्ष कार्यालय.

१२) व्यवस्थापक उपहारगृह, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

१३) निवडनस्ती.

**प्रतिलिपी :-**

१) सर्व मंत्रालयीन विभाग.

२) उप अभियंता (विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

३) शाखा अभियंता (स्थापत्य), सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.